पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २५

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०४/२०१८** वेळ - दुपारी **०३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०६/०४/२०१८** रोजी दुपारी **०३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४. मा.भोईर सुरेश शिवाजी
५. मा.चिंचवडे सचिन बाजीराव
६. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
७. मा.कोकणे संतोष अंकुश

याशिवाय मा.एम.बी.शेख - उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्र.२) “मनोविकृती चिकित्सक” अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३) सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नती देणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) सन २०१८-१९ च्या मंजुर अंदाजपत्रकातील समाविष्ट नविन कामांना प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.४ कृष्णानगर माधील पुर्णानगर व शिवतेजनगर मध्ये स्ट्रॉर्म वॉटर लाईन टाकणेचे कामातून त्रिवेणीनगर चौक येथे शरदनगर झोपडपट्टीपासून हॉटेल सौदामिनी समोरून तळवडे रोडपर्यंत स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणेस मान्यता देणेबाबत – मा.सचिन चिंचवडे, म.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.संतोष कोकणे                    अनुमोदक – मा. अश्विनी जाधव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक – ०६/०४/२०१८ ची पाक्षिक सभा सोमवार दिनांक ०९/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती - सोमवार दिनांक ०९/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २५

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०६/०४/२०१८ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०९/०४/२०१८** वेळ - दुपारी **०२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०६/०४/२०१८ ची तहकूब सभा सोमवार दिनांक **०९/०४/२०१८** रोजी दुपारी **०२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| **१. मा.सोनवणे शारदा हिरेन** | **-** | **सभापती** |
| २. मा.अश्विनी संतोष जाधव | - | उपसभापती |
| ३. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | | |
| ४. मा.भोईर सुरेश शिवाजी | | |
| ५. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | | |
| ६. मा.यादव मीनल विशाल | | |

याशिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **२७/०३/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक – २४**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ९५ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०९/०४/२०१८

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

नवी सांगवी येथील दशक्रीया घाटावर एफ.आर.पी. पध्दतीचे स्वच्छतागृह बांधलेले आहे. सदर स्वच्छतागृह ८ ते १० वर्षापासून असून एफ.आर.पी.चे असल्याने सार्वजनिक वापरामुळे अस्वच्छ व वापरण्यास सोयीस्कर नाही. तसेच आरोग्य विभागास साफसफाईकामी अडचणी निर्माण होतात. यामुळे या ठिकाणी स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत जुने स्वच्छतागृह काढून नविन सार्वजनिक स्वच्छतागृह बांधणे योग्य होईल. तरी नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ येथील स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे हे काम सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात काढणेत आले होते. तरी या कामांतर्गत अत्याधुनिक पध्दतीने Compostie Panel मध्ये दशक्रीया विधी घाट, वेताळ महाराज घाट, एम.के.हॉटेल चौक इ.ठिकाणी शौचालय व मुतारी (स्त्री/पुरुष) चे काम करुन घेणेबाबतचे स्थळ बदलाचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९६ | विषय क्रमांक – ०२
दिनांक – ०९/०४/२०१८ | विभाग – प्रशासन
सुचक – मा.सुरेश भोईर | अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३६/२०१८, दि.३१/०३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'मनोविकृती चिकित्सक' अभिनामाचे पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. या संवर्गामध्ये रिक्त असणारे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

'मनोविकृती चिकित्सक' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'मनोविकृती चिकित्सक' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.वडगावकर गौरव प्रविण यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'मनोविकृती चिकित्सक' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे.

तरी डॉ.वडगावकर गौरव प्रविण यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'मनोविकृती चिकित्सक' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९७ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०९/०४/२०१८

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग – अ मधील सहाय्यक आयुक्त या पदाची एकूण ११ पदे मंजूर आहेत. शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील ६ व महानगरपालिकेच्या आस्थापनेतील पदोन्नतीने ५ अशी मंजूर आहेत. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ पदांपैकी सध्या ३ पदे रिक्त असल्याने प्रशासकीय कामकाज पुर्ण कार्यक्षमतेने होत नाही. महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एस.आर.व्ही.-२०१४/ प्र.क्र.३५४/१४/का.१२, दिनांक ०५/१०/२०१५ नुसार काही पदांसाठी पदोन्नती कालावधी ९० टक्के म्हणजेच ४.५ वर्ष पूर्ण झाल्यास पदोन्नती देणेबाबत शासन निर्णय आहे. श्री.संदीप दादासाहेब खोत यांचा प्रशासन अधिकारी या पदावर ४.५ वर्षे कालावधी पूर्ण होत आहे. तसेच सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार ते वर्ग – अ मधील सहाय्यक आयुक्त पदाचे पदोन्नतीस पात्र आहेत. त्यामुळे श्री.संदीप दादासाहेब खोत यांना सहाय्यक आयुक्त या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९८ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०९/०४/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकामधील सर्व कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस दरवर्षीप्रमाणे एकत्रित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील कामे वेळेत पूर्ण करणेसाठी या आर्थिक वर्षातील कमी कालावधी विचारात घेता सर्व कामांच्या नावासमोर नमुद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता घेतल्यास त्या/त्याकामाची केलेली तरतूद त्याच वर्षात खर्च करता येईल. सबब सर्व कामांच्या नावासमोर नमुद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता मिळाल्यास त्या/त्या कामाची केलेली तरतूद त्याच वर्षात खर्च करता येईल व कामांच्या निविदा प्रक्रीया हाती घेऊन सदरची कामे उपलब्ध कालावधीमध्ये चालू करता येतील. सबब सन २०१८-१९ च्या मंजूर अंदाजपत्रकात नमुद केलेप्रमाणे ज्यांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहेत अशा सर्व भांडवली व महसुली कामे तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तु व सेवांच्या खरेदीच्या लेखाशिर्षा समोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याचा तसेच ही प्रशासकीय मान्यतेची रक्कम निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रक्कमे इतकी राहील यास मान्यता देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी महसुली व भांडवली अंदाजपत्रकाचे सर्व नविन कामांना त्यांच्यासमोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमांना तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तु व सेवांच्या खरेदीच्या लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय

रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९९ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०९/०४/२०१८

सुचक – मा.स्वाती काटे अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.सचिन चिंचवडे, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.४ कृष्णानगर (नविन प्रभाग क्र.११) मधील त्रिवेणीनगर चौकाजवळ शरदनगर झोपडपट्टीमधील सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून नेणेकरीता यापुर्वी त्याठिकाणी स्ट्रॉर्म वॉटर लाईन टाकणेत आलेली आहे. परंतु सदरची लाईन वारंवार तुंबते व त्यामुळे रहदारीच्या रस्त्यावर सतत पाणी वाहुन रस्ता खराब होत आहे. तसेच सदरचे पाणी रोडवरून नागरिकांच्या घरात जाते म्हणून सदरची कमी व्यासाची पाईपलाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची पाईपलाईन टाकावी त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी होईल व रस्ता खराब होणार नाही अशी मागणी प्रभाग क्र.११ व १२ मधील नगरसदस्य वारंवार करत आहेत. तसेच प्रभाग क्र.११ मधील नगरसदस्य यांनी सदरचे काम प्रभाग क्र.४ कृष्णानगर (नविन प्रभाग क्र.११) मधील पुर्णानगर व शिवतेज नगर मध्ये स्ट्रॉर्म वॉटरलाईन टाकणे (निविदा क्र.७३/६५-२०१७-१८) या चालू कामातून करणेबाबत केली आहे. तरी सदर कामातून वरील ठिकाणी कामकरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/१७७/२०१८
दिनांक : ०९/०४/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.